# "पॅट"ची अनुभवसिध्द प्रभावी आयुर्वेदिक औषधे

**ॲमीपॅट टॅब्लेट्स :-** आव,आमांश,संग्रहणी,प्रवाहिका,चिकट संडास, पोटफुगी, पोटदुखी इ.वर

**अल्सीपॅट टॅब्लेट्स :-** आम्लपित्त(ॲसिडिटी),गॅसेस,छातीखाली जठराशी जळजळणे, सतत बारीक डोके दुखणे इ.वर

**नर्व्हीपॅट सिरप :-** बुध्दिमत्ता,स्मरणशक्ती,निर्णयक्षमता व मानसिक सहनशीलता यांचा दर्जा उंचाविण्याकरिता एक उत्तम बुध्दिवर्धक.

**डबलमिल्स लिक्विड :-** अल्कोहोलविरहीत,गुंगी न आणणारे,आगळ्या-वेगळ्या चवीचे दिपक-पाचक टॉनिक.

**फेमिपॅट सिरप :-** महिलांकरिता परिपूर्ण टॉनिक, मासिक पाळीतील सामान्य तक्रारींवर विशेष उपयुक्त.

**ल्युकोपॅट टॅब्लेट्स :-** महिलांमधील मासिक पाळीतील सामान्य तक्रारींमुळे होणाऱ्या ॲनिमिया (प्रमेह) मध्ये विशेष गुणकारी.

**कॅम्पाईल टॅब्लेट्स :-** मूळव्याध (बवासीर, पाईल्स्), तोंड येणे (मुँहमे छाले), डोळ्यांची आग व लालपणा, हातापायांची आग, व सर्व प्रकारच्या उष्णतेच्या तक्रारींवर अत्यंत प्रभावी औषध.

**लिव्हस्प्लिन सिरप :-** एक उत्तम परिपूर्ण दिपक-पाचक-सारक टॉनिक,कावीळ, तसेच लिव्हर व स्प्लिनला येणारी सूज यामध्ये विशेष लाभदायक, लहान मुले,महिला व वयोवृध्द रुग्णांना विशेष पसंत.

**लिव्हस्प्लिन टॅब्लेट्स :-** आयुर्वेदांतील विशेषमान्य आरोग्यवर्धिनी व जगन्मान्य कोरफड युक्त पाठामुळे सर्व प्रकारच्या काविळींवर, यकृत व प्लीहा यांना येणारी सूज यांमध्ये उपयुक्त, नियमित व सतत /अपरंपार मद्यपान करणाऱ्यांना वरदान (विशेष उपयुक्त)

**पॅट कफ सिरप :-** प्रदूषणामुळे व हवामानांतील बदलामुळे होणाऱ्या सामान्य सर्दी-खोकल्यावर लाखों रूग्णांनी प्रशंसिलेले आयुर्वेदिक, अल्कोहोलविरहीत, गुंगी न आणणारे उत्कृष्ठ चवीचे अनुभवसिध्द कफ सिरप.

(फक्त आयुर्वेदिक / मेडीकल स्टोअर्स / वैद्यकीय व्यावसायिकांसाठी प्रकाशित)

इ. स. १९७९ पासून आयुर्वेदाच्या सेवेत!



PAT पॅट फार्मास्युटिकल्स्

यशोमंगल,जुन्या पोस्टाजवळ, डॉ.पटवर्धन रोड,
पनवेल (जि.रायगड)४१०२०६.
फोन :- 022 - 27456039
E-mail:- pat_pharma@yahoo.com


PAT

# ॲमीपॅट

## टॅब्लेट्स



आपणांस माहीत आहे कां ?
प्रत्येक ३ रा भारतीय
आंव-आमांशग्रस्त आहे.



आव,आमांश,संग्रहणी,
प्रवाहिका,चिकट संडास,
पोटदुखी ,पोटफुगी,इ.वर



निरंतर निरामय आरोग्याचा महामंत्र :-
संतुलन व संवर्धन करा
रोगप्रतिकारशक्ती, सौंदर्य, बुध्दी, मनसंतुलन व शक्ती ।
"पॅट"ची औषधे देतील निरंतर निरामय आरोग्याची प्राप्ती ।।

।।श्रीगणेशाय नमः।।   ।।श्रीधन्वन्तरये नमः।।   ।।श्रीकरंजेश्वरी नमः।।   ।।श्रीव्याडेश्वराय नमः।।

## आपणांस माहीत आहे कां ?
## प्रत्येक ३ रा भारतीय आंव-आमांशग्रस्त आहे.

कदाचित आपणांस सुध्दा हा त्रास असू शकेल.याकरिता हे माहिती पत्रक जरुर वाचा.

(टीप:-आमांशामुळे निर्माण होणाऱ्या तक्रारी रोजच्या जीवनांत सोसण्याजोग्या असतात.व म्हणूनच आमांश दुर्लक्षित होतो व इतवया प्रचंड प्रमाणांत लागण असून सुध्दा आमांशाची तक्रार घेऊन डॉवटरकडे प्रत्येक ३रा रुग्ण येत नाही.लक्षांत ठेवा, दुर्लक्षित, जुनाट, प्रदिर्घ आमांश हा भस्मासुर आहे.तो उद्या आपले जीवनच व्यापून टाकू शकतो.इतवया प्रचंड प्रमाणांत अस्तित्वांत असलेल्या रोगाशी सामना करण्याच्या भावनेंतूनच आपणांशी थेट संपर्क साधत आहोत.)

## आंव-आमांश म्हणजे काय ?

बाह्यदर्शनी,आंव-आमांश म्हणजे संडासाव्दारे पांढरा चिकट पदार्थ जाणे व संडास मैला चिकट असणे.

## आंव-आमांशाची लक्षणे:-

१)संडासला थोडे-थोडे व वारंवार जावे लागणे व तरीही पोट साफ न झाल्याची भावना असणे.
२) वर सांगितल्याप्रमाणे,संडासाव्दारे पांढरा चिकट पदार्थ जाणे व संडास मैला चिकट असणे.
३) पोटफुगी व गॅसेस असणे. ४) आम्लपित्त व गॅसेस असणे. ५) हातपाय (अकारण) दुखणे.
६) काहीजणांना काही खाल्ल्यावर वा जेवल्यावर (किंवा जेवणामध्येच) संडासाची घाईची भावना होऊन जावे लागणे.

## जुनाट वा प्रदिर्घ आमांशामुळे शरिरांतील इतर अवयवांवर वा संस्थांवर परिणाम होतो कां ?

याचे उत्तर होय असे आहे.कित्येक व्यवितंमध्ये वर्षानुवर्षे आंव-आमांशाचा आजार असतो व त्यामुळे:-
१) ऐकू कमी येणे. २) दृष्टी कमी होणे वा अंधुक दिसणे. ३) हाडे व दांत पोकळ होणे. ४) हातापायातील शवित जाणे वा कमजोरी असणे.
अमीबा हे अतिसूक्ष्म जीवाणू असल्याने दिर्घकालीन दुर्लक्ष केल्यास अन्नसंस्थेतून रवत्तवाहिन्यांमार्फत रवतांत मिसळतात व त्यामुळे इतर सर्व संस्थांमध्ये त्याचा प्रादुर्भाव होतो व वरील दुष्परिणाम होऊ / दिसू लागतात.

## आमांश कोणाकोणाला होऊ वा असू शकतो ?

आमांश हा वय, लिंग,जात,धर्म,गरिब-श्रीमंत भेद मानत नसून तो कोणालाही होऊ शकतो,किंबहुना आमांश प्रत्येकाला केव्हा ना केव्हा तरी होतोच वा झालेला असतोच.फवत त्याचे पूर्ण नि:स्सारण झालेले नसते.(वर सांगितल्याप्रमाणे बाहयदर्शनी लक्षणांकडे प्रदिर्घ दुर्लक्ष वा औषधे पूर्ण नियोजित काळ न घेणे हे त्याचे प्रमुख कारण असते.) अलिकडेच झालेल्या सर्वेक्षणावरून असे दिसून आले आहे की,

**प्रत्येक ३ रा भारतीय आंव-आमांशग्रस्त आहे.**

आमांशाने माणूस मरत नाही. किंवा त्याच्या रोजच्या जीवनांत फारशा तक्रारी निर्माण होत नाहीत किंवा त्या सोसण्याजोग्या असतात. व म्हणूनच आमांश दुर्लक्षित होतो. आजकाल फास्टफूड ही जीवनशैली झालेली आहे. रस्त्यावरील (गाडीवरील) एखादा वडापाव / आम्लेटपाव वा एवादे ग्लासभर सरबत वा पाणीसुध्दा आमांशाचा प्रादुर्भाव होण्यास पुरेसा आहे.अर्थात बर्गर-पिझ्झा-सॅण्डविचेससुध्दा अपवाद नाहीत.अरे हो पावभाजी, पुलाव,इडली,डोसा सुध्दा आहेतच.विशेषत: त्याबरोबर दिल्या जाणाऱ्या चटण्या,सॉस व पाव हे जास्त आमांशजन्य असण्याची शवयता आहे. थोडक्यांत, उघडयावरील / शिळे अन्न व पाणी यामुळे आंव-आमांशाचा प्रादुर्भाव हा सर्वत्र होत असतो.

## आंव-आमांशाच्या नियंत्रणातील प्रमुख अडथळे कोणते ?

अमीबा हा अमर प्राणी मानला गेला आहे हे आपणा सर्वांना माहीत आहेच व त्याचे मुख्य कारण त्याची अतिप्रजननशवित व धोवयाच्या परिस्थितीत तो स्वत:भोवती एक कठीण कवच निर्माण करू शकतो की जे उष्णता व केमिकल यांना प्रतिरोधक असते. त्यामुळे त्याची पुनर्लागण व पुनर्उत्पत्ति यांची शवयता अतिप्रचंड असते.वस्तुत: एकदा आमांशाची लागण झाली असल्यास त्याचे पूर्ण नि:सारण होण्यास कमीतकमी १४ दिवस ते २ महिने एवढा कालावधी लागतो. (व म्हणूनच आयुर्वेदिक / ॲलोपॅथिक औषधांच्या कोर्सचा कालावधी एवढाच असतो.) या सर्वात अजून अडचणीचे म्हणजे या दरम्यान पुन्हा जर आमांशाची लागण झाली तर औषधोपचार अजून २ महिने लांबतो. या दुष्ट चक्रामुळेच आंव-आमांश हा चिकट-चिवट आजार मानला जातो.यामध्ये आणखी एका पैलूचा विचार करावा लागतो.तो म्हणजे औषधाचा कालावधी मोठा (२ महिने) व पुनर्लागणाची शवयता अतिप्रचंड (पथ्य होत नाही) व त्यामुळे ॲलोपॅथिक औषधांचा उपचार घेताना त्यांच्या दुष्परिणामांचा साकल्याने व बारकाईने विचार करावा लागतो. किंबहुना अशी औषधे टाळून / कमी करून,पर्यायी कमी / जवळजवळ दुष्परिणाम नाहीच अशी आयुर्वेदिक औषधे घेणे अधिक सुलभ,हितावह व परवडण्याजोगे ठरते.

## आमांशामध्ये ॲमीपॅट टॅब्लेट्स कशा काम करतात ?
## प्रमुख घटक :- रसपर्पटी,बेलघन,कुटजघन,रसोत (दारुहळदघन),शंखभस्म

ॲमीपॅट टॅब्लेट्स मधील रसपर्पटी,बेलघन व कुटजघन हे अमीबानाशक असून अमीबांची वाढ(प्रजनन) खुंटवते.तसेच बेलघन हे संडासमैल्यातील चिकटपणा कमी करुन त्यामधील द्रवाचे प्रमाण नियंत्रित करते.तसेच,ॲमीपॅट टॅब्लेट्स मधील या घटकद्रव्यांचे प्रमाण व गोळया व घटकद्रव्ये बनवितांना वापरलेली प्रक्रिया यामुळे त्यांचा एकत्रित गुणधर्म हा अधिक प्रभावी ठरतो.आमांशामध्ये आम्लपित्त असतेच, व आमांशनाशक औषधे हीसुध्दा आम्लपित्त वाढविणारी असतात.सतत आमांश म्हणजेच सतत आम्लपित्त,यामुळे आंतडयांना सूक्ष्म जखमा होण्याची शवयता असते.अशा परिस्थितीत ॲमीपॅट टॅब्लेट्स मधील रसोत(दारुहळदघन) या प्रभावी जंतुनाशकाची उपस्थिती पुढील गुंतागुंत होण्याचे टाळते.

आम्लपित्त हे जणु आमांशाचे जुळे भावंड आहे.ॲमीपॅट टॅब्लेट्स मधील शंख भस्म हे आम्लपित्तावरील सिध्द औषध आहे. आम्लपित्ताबरोबरच असलेला गॅसेस,पोटफुगी व पोटदुखीचा त्रास शंखभस्मामुळे कमी होतो.आंव-आमांशाच्या ॲलोपॅथिक योजनेमध्ये सर्वसाधारणपणे वापरली जाणारी मेट्रोनिडॅझोल,टिनिडॅझोल व इतर औषधांचे दुष्परिणाम डोकेदुखी,चवकर येणे, उलट्या,पचनाचे विकार,गॅसेस इ. दिसून येतात.अलिकडच्या संशोधनात यांतील काही औषधे ही कॅन्सर रोगास निमंत्रण देतात हेही सिध्द झालेले आहे.म्हणूनच, ॲलोपॅथिक योजनेपेक्षा आंव-आमांशामध्ये ॲमीपॅट टॅब्लेट्स या अधिक विश्वासार्ह आहेत.

ॲलोपॅथिक औषध योजनेत वर सांगितलेल्या औषधांबरोबरच ॲण्टासिड व ॲण्टिफ्लॅटयुलण्ट औषधेसुध्दा वापरावी लागतात.म्हणजेच एका रोगावर कमीतकमी ३ औषधे वापरावी लागतात.ॲमीपॅट टॅब्लेट्समध्ये या सर्व औषधांचा अंतर्भाव असल्यामुळे ॲलोपॅथिक औषध योजने समोर ॲमीपॅट टॅब्लेट्सची आयुर्वेदिक उपचारयोजना ही अधिक सोईची,प्रभावी व माफक खर्चाची ठरते.

## ॲमीपॅट टॅब्लेट्स कोणी घ्याव्यात ?

१)आंव-आमांश,चिकट संडास,पोटफुगी व पोटदुखी ही वर सांगितलेली आमांशाची लक्षणे असणाऱ्यांनी ॲमीपॅट टॅब्लेट्स घ्याव्यात.
२)वारंवार बध्दकोष्ठावरील चूर्ण-काढ़े-गोळया घेऊनसुध्दा आपण संपूर्ण बरे होतोय असे वाटत नाही,अशावेळी ॲमीपॅट टॅब्लेट्स २/२ गोळया दिवसांतून २ वेळा १४ दिवस घेऊन पाहा, नवकीच गुण येईल.
३)वारंवार ॲसिडीटी होतेय, ॲलोपॅथिक वा आयुर्वेदिक आम्लपित्तावरील बरीच औषधे घेतली,पण पुन्हा आपलं येरे माझ्या मागल्या! अशावेळी ॲमीपॅट टॅब्लेट्स २/२ गोळया दिवसांतून २ वेळा १४ दिवस घेऊन पाहा,खात्रीने फरक पडेल.
४)आपण कधीकधी वा वारंवार उघडयावरील अन्न (पावभाजी,वडापाव इ.)खात असाल तर सुरक्षिततेचा उपाय म्हणून दर ३-६ महिन्यांनी एकदा ॲमीपॅट टॅब्लेट्स चा १४ दिवसांचा १ कोर्स (२-२ गोळया दिवसांतून २ वेळा) जरुर करा व निश्चिंत राहा.
५)आपली फिरतीची नोकरी असेल वा कारणा निमित्त आपण प्रवास करत असाल तर आपण वर्षांतून किमान ३ ते ४ वेळा ॲमीपॅट टॅब्लेट्स चा कोर्स (२/२ गोळया दिवसांतून २ वेळा-१४दिवस) अवश्य करा व निश्चिंत राहा.पण पुढे मात्र खाण्यापिण्याची खबरदारी जरुर घ्या!

## ॲमीपॅट टॅब्लेट्स कशा घ्याव्यात ?

**अ) तीव्र आमांशाची भावना असल्यास,**

| | | |
|---|---|---|
| मोठयांस | २ / २ गोळया दिवसांतून ३ वेळा | १४ दिवस |
| व नंतर | २ / २ गोळया दिवसांतून २वेळा | १४ दिवस |
| लहानांस (१० वर्षांवरील) | १ / १ गोळी दिवसातून ३ वेळा | १४ दिवस |
| व नंतर | १ /१ गोळी दिवसांतून २ वेळा | १४ दिवस |

**ब) सुरक्षेचा उपाय म्हणून घेत असल्यास,**

| | | |
|---|---|---|
| मोठयांस | २ /२ गोळया दिवसांतून २ वेळा | १४ दिवस |
| लहानांस | १ / १ गोळी दिवसांतून २ वेळा | १४ दिवस |

## अधिक गतीने व प्रभावी गुण येण्यास, ॲमीपॅट टॅब्लेट्सचा कोर्स चालू असताना (पथ्य) काय करावे ?

१) पाणी उकळून व गाळून घ्यावे.
२) शक्यतो उघडयावरील थंड व शिळे पदार्थ टाळावेत.
३)आमांशाबरोबर बध्दकोष्ठ असल्यास,ॲमीपॅट टॅब्लेट्सबरोबर त्रिफळा चूर्ण /अभयारिष्ट/इसबगोल आठवडयांतून ३/४ वेळा घ्यावे.
४)आमांशाबरोबर तीव्र आम्लपित्ताची भावना असल्यास, ॲमीपॅट टॅब्लेट्स बरोबर अल्सीपॅट टॅब्लेट्स व अविपत्तिकर चूर्ण घ्यावे.
५)आमांशाबरोबर,कावीळ किंवा मंद भूकेची तक्रार असल्यास, ॲमीपॅट टॅब्लेट्स बरोबर लिव्हस्प्लिन सिरप / टॅब्लेट्स घ्याव्यात.